अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मान्यतेनुसार राज्यातील खाजगी संस्थांना नविन महाविद्यालय/प्रवेशक्षमतेत वाढ/घट /अतिरिक्त अभ्यासक्रम सुरु करण्यास शासनाची मान्यता देण्याबाबत

**महाराष्ट्र शासन**

उच्च व तंत्रशिक्षण विभाग,

**शासन निर्णय** :- क्र.टिईएम-२००९/( २६ /०९)/तांश-१,

मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२

दिनांक : - १५ जून, २००९

संदर्भ:- अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद , नवी दिल्ली यांचे पत्रक्रमांक

१)५०६/०७/एमएस/एमबबहए २००७/००१, दि. २२ ऑगस्ट, २००८

**शासन निर्णय:-** अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने त्यांच्या संदर्भाधीन पत्रान्वये खाली नमूद शैक्षणिक संस्थेस तिच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे अभ्यासक्रम सुरु करण्यास खालीलप्रमाणे मान्यता दिलेली आहे. त्यास अनुसरुन याबाबत शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

| संस्थेचे नांव | अभ्यासक्रमाचे नांव | ३० जून, २००८ पर्यन्त प्रवेशक्षमता | ३० जून, २००८नंतर अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने सुधारित केलेली प्रवेशक्षमता |
|---|---|---|---|
| अस्मा इंस्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट स. नं. ८५ शिवणे, तहसील हवेली, जि. पुणे ४११ ०२९ | १) एम.बी.ए. | ६० | ६० |
| | २)एम.सी.ए. | ०० | ६० |
| | एकूण | ६० | १२० |

तथापि रिट याचिका क्र. ३९१६/२००१ अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद नवी दिल्ली विरुध्द महाराष्ट्र शासन या याचिकेसंदर्भात दि. १७.०९.२००१ रोजी देण्यात आलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने दि. ३० जून, नंतर अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेकडून मान्यता प्राप्त प्रस्तावांना पुढील शैक्षणिक वर्षाकरिता मान्यता देण्यात येते.

आता या शासन निर्णयाद्वारे उपरोक्त संस्थेस खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून शैक्षणिक वर्ष २००९-२०१० पासून उपरोक्त प्रमाणे अभ्यासक्रम सुरु करण्यास तिच्या नावासमोर दर्शविलेल्या प्रवेशक्षमतेसह मान्यता देण्यात येत आहे.

Scanned with CamScanner

१. प्रस्तुत, बाबतीत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या तसेच दिनांक २४ मे, १९८३ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या अटींचा पूर्तता करणे संबंधित संस्थेस बंधनकारक राहील.

२. शासनाने विहित केलेल्या तसेच अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संस्थेस करारनामा करावा लागेल तसेच संबंधित कागदपत्रांची आणि औपचारिक बाबींची पूर्तता संचालक ( तंत्रशिक्षण ) यांच्या समतीने समाधानकारकरीत्या करण्यात यईल.

३. सदर अभ्यासक्रमाच्या संलग्नीकरणासाठी संबंधित संस्थेने महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ मधील तरतुदीनुसार संबंधित विद्यापीठाची मान्यता संलग्नीकरण घेणे आवश्यक आहे.

४. संबंधित संस्थेने संचालक ( तंत्रशिक्षण ) यांचेकडे आवश्यक ती रक्कम ठेव संयुक्त खात्यात भरून इतर कायदेशीर बाबींची पूर्तता करावी.

५. सदर पदवी अभ्यासक्रमाचे प्रवेश शासनाने मान्य केलेल्या संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमानुसार पध्दतीनुसार करण्यात येतील.

६. याशिवाय संचालक ( तंत्रशिक्षण) महाराष्ट्र राज्य मुंबई व संबंधित विद्यापीठ यांनी घालून दिलेल्या अन्य अटी व शर्ती लागू राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

( भ. सं. वानखेडे )
अवर सचिव , महाराष्ट्र शासन

प्रति,
संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
संबंधित कुलसचिव, विद्यापीठ संचालकांमार्फत )
संबंधित संस्था
प्रत माहितीसाठी
सल्लागार ( यूजी/पीजी)( इं अॅण्ड टी ) अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, ७ वा माळा, चंद्रलोक भवन, नवी दिल्ली-११०००१
पश्चिम विभागीय कार्यालय, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, इंडस्ट्रियल इन्शुरन्स बिल्डींग, दुसरा मजला, चर्चगेट, मुंबई ४०० ०२०
निवड नस्ती.

Scanned with CamScanner